02 DEC. 2007 17:00 P 2

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT AUTHORITY

म्हाडा
MHADA

जा.क्र.मुंमं/उमुअ/प्रनिस/न.क्र.बीडीडी-०७/ २५ /१८
दिनांक : ११/१/१८

१०० | कोनिप
१२.०१.१८

प्रति,

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
तथा अध्यक्ष-शक्ती प्रदत्त समिती, बीडीडी चाळी पुनर्विकास.
मंत्रालय, मुंबई.

( मा. अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे मार्फत )

विषय - म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग [ बीडीडी ] चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.०८/०१/२०१८ रोजी झालेल्या " शक्ती प्रदत्त समिती"च्या नवव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

महोदय,

म्हाडातर्फे राबविण्यात येणा-या मुंबई विकास विभाग [ बीडीडी ] चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाचे नियंत्रण व वेळोवेळी आढावा घेण्यासाठी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समितीची नववी बैठक दि.०८/०१/२०१८ रोजी दुपारी ०४:३० वाजता संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्ताचा मसुदा मान्यतेकरिता या सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेसाठी सविनय सादर.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / म्हाडा
तथा
सदस्य सचिव / शक्ती प्रदत्त समिती -बीडीडी चाळी पुनर्विकास कक्ष

सोबत - दि.०८/०१/२०१८ रोजीच्या
बैठकीचे प्रारुप इतिवृत्त

(हस्तलिखित टिप्पणी) १२/१/१८

गृहनिर्माण भवन, कलानगर, वान्द्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी ६६४०५०००
फॅक्स नं. : ०२२-२६५९२०५८

Griha Nirman Bhavan, Kalanagar, Bandra (East), Mumbai-400 051.
Phone : 66405000
Fax No. : 022-26592058 Website : www.mhada.maharashtra.gov.in

विषय - म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग [ बीडीडी ] चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.०८/०१/२०१८ रोजी झालेल्या "शक्ती प्रदत्त समिती" च्या नवव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यात आलेल्या शक्ति प्रदत्त समितीची नववी बैठक दि.०८/०१/२०१८ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे बैठक कक्षात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.संजय कुमार | - मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग |
| २. | श्री.आशिष कुमार सिंग | - मा. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ३. | श्री. एन. जे. जमादार | - मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग |
| ४. | श्री. आर.ए. राजीव | - प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग |
| ५. | श्री. मिलींद म्हैसकर | - उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / प्रा. तथा सदस्य सचिव शक्तिप्रदत्त समिती |
| ६. | श्री.सुभाष लाखे | - मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ |

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्दयांची कार्यसूची व विषयनिहाय टिप्पणी सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. कार्यसूचीत नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | झालेली चर्चा व समितीचा झालेला निर्णय |
|---|---|---|
| १ | शक्तिप्रदत्त समितीच्या आठव्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करणे. | मा. अध्यक्षांच्या अनुमतीने दि.०८/०१/२०१८ रोजी झालेल्या आठव्या शक्तिप्रदत्त समितीचे इतिवृत्त स्थायी करण्यात आले. |
| २ | शिवडी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत सुसाध्यता अहवालाचे सादरीकरण करणे व मुंबई बंदर न्यास यांना अहवाल पाठविणेबाबत निर्णय घेणे. | शिवडी येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी सुसाध्यता अहवाल सादर करण्याबाबत मुंबई बंदर न्यासाने दि.२४/०१/२०१७ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत सुचित केले होते. त्या अनुषंगाने म्हाडाने सर्वांगीण सुसाध्यता अहवाल मा. अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण विभाग) यांचेकडे दि.१३/११/२०१७ रोजी सादर केला. शिवडी |

येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या सुसाध्यता अहवालाचे सादरीकरण नियुक्त वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार श्री. मिलिंद सांभारे यांनी केले. सुसाध्यता अहवालामधील पुढील महत्त्वाचे मुद्दे समितीसमोर सादर करण्यात आले:

अ) शिवडी येथील बीडीडी चाळींखीलील जमिन मुंबई बंदर न्यासाने सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन काऊन्सील (डेव्हलपमेंट डिरोक्टोरेट) यांना व काही भाग बृहन्मुंबई महानगरपालिकेला सन-२०२२ पर्यंत भाडेपट्टयाने दिलेला असून, भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ २.५२ हेक्टर (६.२२ एकर) आहे. या भूखंडामधील १३९४.२९ चौ.मी. भूखंड सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचे आहे.

ब) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त माहितीनुसार या भूखंडावर १२ बीडीडी चाळींमधील ९६० गाळे, १०६ झोपडया, ४९ स्टॉल, ०४ सामाजिक सुविधांची बांधकामे व ०६ धार्मिक स्थळे आहेत.

क) सदरील पुनर्विकास प्रकल्प वि.नि.नि. ३३(९) (ब) नुसार करण्यात येणार असून, पुनवर्सन झाल्यानंतर म्हाडास सुमारे ६५६ विक्रीयोग्य गाळे उपलब्ध होणार आहेत.

ड) या भूखंडामधील ९१५.०० चौ.मी. जमिन बृहन्मुंबई महानगरपालिकेला भाडेपट्टयाने दिली आहे व १३९४.२९ चौ.मी. जमिन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची आहे. सदरील प्रकल्प सुसाध्य होण्याच्या दृष्टीकोनातून बीडीडी चाळीं खालील भुखंड मुंबई बंदर न्यासाकडून तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून रु. १/- या नाममात्र दराने महाराष्ट्र शासनास / म्हाडास हस्तांतरीत होणे आवश्यक आहे.

प) चाळींचा भूखंड प्रत्यक्ष शिवडी रेल्वे स्टेशनच्या लगत असणे, तसेच प्रस्तावित मुंबई ट्रान्स हार्बर लिंक भूखंडातून जाणे व प्रस्तावित रस्ता रुंदीकरण यामुळे भूखंडाचा काही भाग बाधित होत असल्याची तांत्रिक अडचण नियोजन आराखडा तयार करतेवेळीस निदर्शनास आली.

फ) नायगांव, ना.म. जोशी मार्ग व वरळी येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाप्रमाणे शिवडी बीडीडी चाळ पुनर्विकास

| | | |
|---|---|---|
| | | प्रकल्पासाठी सुद्धा म्हाडाची नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती होणे आवश्यक आहे.<br>ट) प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान गाळेधारकांना संक्रमण गाळे उपलब्ध करण्याच्या दृष्टिकोनातून संक्रमण शिबीर बांधण्यासाठी प्रकल्प कालावधीपुरता मुंबई बंदर न्यासाच्या मालकीचा लगतचा भूखंड म्हाडास हस्तांतरीत करणे आवश्यक आहे.<br>सदरील सादरीकरणाअंती सुसाध्यता अहवाल मुंबई बंदर न्यासास पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. |

या चर्चेनंतर उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या अनुमतीने बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

( मिलींद म्हैसकर )
उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / म्हाडा
तथा सदस्य सचिव / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास

( संजय कुमार )
मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग
तथा सदस्य / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास

( सुमित मल्लिक )
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
तथा अध्यक्ष / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास